


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ । अंक १५२ । सोमवार २ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## परदेशात अडकलेल्या नागरिकांशी प्रशासनाकडून संपर्क - ना.विखे पाटील

### जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मध्यपूर्व व आखाती प्रदेशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अडकलेल्या नागरीकांशी संपर्क साधण्यात आला असून, भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय व महाराष्ट्र शासनाने परदेशात अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षिततेसाठी पावले उचलली आहेत. या भागात अडकलेल्या अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या मदतीसाठी जिल्हा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असल्याची माहिती जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

परदेशात अडकलेल्या नागरीकांच्या नातेबाईकांनी नियंत्रण कक्षात संपर्क साधावा उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकार्यांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले. परदेशात अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेवर महाराष्ट्र शासन व परराष्ट्र मंत्रालय यांचे बारकाईने लक्ष असून, त्यांच्या संरक्षणासाठी व आवश्यकतेनुसार त्यांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रशासनाचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.राज्य सरकारने केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या सूचनेनूसार चोवीस तास हेल्पलाईन नंबर देण्यात आले असून संपर्कासाठी ०२२-२२०२७९९० असा क्रमांक देण्यात आला आहे.

अहील्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षातील ०२४१-२३२३८४४. व २३५६९४० क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन नंबर मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील जे नागरिक या युद्धजन्य परिस्थितीत अडकले आहेत त्यांना विमानसेवा बंद असल्याने थांबण्याची वेळ आली आहे.या सर्वाशी जिल्हाधिकारी कार्यालयाने संपर्क केला असून काही नागरीकांशी व्यक्तिगत आपणही संपर्क करून दिलासा दिला असल्याचे त्यांनी सांगितले.माहिती देण्यासाठी व मदतीसाठी जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

**विविध देशांतील भारतीय दूतावासांचे २४ ७ आपत्कालीन क्रमांक उपलब्ध**

तात्काळ मदतीसाठी इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), पॅलेस्टाईन (रामल्लाह), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी), कुवैत, बहरीन, मस्कत, जॉर्डन आणि इराक (बगदाद) येथील भारतीय दूतावासांनी विशेष आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक, व्हॉट्सअॅप क्रमांक आणि ईमेल आयडी जाहीर केले आहेत. नागरिकांनी गरजेनुसार या क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

## २५० ग्रॅम सोने देण्याचे आमिष; कोळगावात ५.३० लाखांची लूट

### १० ते १२ जणांच्या टोळीचा हल्ला; बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** २५० ग्रॅम सोने देण्याचे आमिष दाखवून तरुणास कोळगाव येथे बोलावून ५ लाख ३० हजार ६०० रुपयांची रोकड व मोबाईल, कागदपत्रे लुटल्याची घटना शुक्रवारी (दि. २८ फेब्रुवारी) दुपारी घडली. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात १० ते १२ अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अविनाश दिनकर शिंदे (वय १९, रा. कडवावाडी, ता. खेड, जि. पुणे) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. काही दिवसांपूर्वी कारागृहात ओळख झालेल्या व्यक्तीने ५ लाख रुपयांत २५० ग्रॅम सोने देण्याचे आमिष दाखवले होते. त्यानुसार व्यवहारासाठी कोळगाव (ता. श्रीगोंदा) येथे येण्याचे सांगण्यात आले.

फिर्यादी व त्यांचा मित्र नरेंद्र ठाकूर हे शुक्रवारी सकाळी चाकणहून निघाले.




दुपारी कोळगाव परिसरात पोहोचल्यावर संबंधित इसमाने फोनवरून ठिकाण बदलण्यास सांगितले. क्रिकेट हायस्कूलजवळील रस्त्यावर थांबले असता १० ते १२ जणांच्या टोळीने अचानक हल्ला केला. लाकडी दांडक्यांनी मारहाण करून फिर्यादीकडील ४ लाख ९८ हजार ५०० रुपये (५०० रुपयांच्या ९९७ नोटा), १ हजार ५०० रुपये (१०० रुपयांच्या १५ नोटा) तसेच मोबाईल, बॅग व कागदपत्रे जबरदस्तीने हिसकावून घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

लुटीत आयफोन १३ प्रो (एअरटेल सिम ९८९०२००३८०), विवो कंपनीचा मोबाईल (सिम ७२४९६१०१६५), पॅनकार्ड, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स तसेच एसबीआय, अॅक्सिस व एचडीएफसी बँकांचे एटीएम कार्ड आदींचा समावेश आहे. एकूण मुद्देमाल ५,३०,६०० रुपयांचा असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

हल्लेखोरांमध्ये अंदाजे २५ ते ३० वयोगटातील एका महिलेचा तसेच २० ते ४५ वयोगटातील इतर इसमांचा समावेश असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेनंतर फिर्यादींनी बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

देवगिरी प्रांत, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने

## अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या वतीने वकिलांसाठी कार्यशाळा

### हिंदू वारसा हक्क कायदा व एकत्र कुटुंब व्यवस्था या विषयावर ज्येष्ठ विधीज्ञ सुधाकर आव्हाड यांचे मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**हिंदू वारसा हक्क कायदा त्याची व्याप्ती व महिलांचे हक्क या विषयावर सखोल माहिती देण्यासाठी देवगिरी प्रांत, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने अखिल भारतीय अधिवक्ता परिषद आयोजित वकिलांसाठी कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत ''हिंदू वारसा हक्क कायदा व एकत्र कुटुंब'' या विषयावर ज्येष्ठ विधीज्ञ सुधाकर आव्हाड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

सुधाकर आव्हाड म्हणाले की, जर एखाद्या कुटुंबात कोणाचा मृत्यू किंवा जन्म झाला



तर त्याप्रमाणे हक्क प्राप्त होतात का, एखाद्या कुटुंबात बाळाचा जन्म झाला तर त्याचे हक्क काय असतील, आणि कुटुंबातील कर्त्याचा मृत्यू झाला तर त्याचे हक्क काय असतील, या सर्व बाबी 'हिंदू वारसा हक्क कायद्या'त स्पष्ट केलेल्या आहेत.

इतिहास सांगताना त्यांनी ■ पान ४ वर

## बनावट बालभारती पुस्तकांवर सरकारने ठोस भूमिका घ्यावी - आ. काशिनाथ दाते

### विधानसभेत आ. दातेंचा घणाघाती सवाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात एमआयडीसी परिसरातील 'प्रतिमा प्रिंटर्स' येथे बालभारतीची बनावट पाठ्यपुस्तके छापली जात असल्याच्या गंभीर प्रकरणावर तारांकित प्रश्न उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या संवेदनशील मुद्द्यावर सभागृहाचे लक्ष वेधत त्यांनी शासनाकडून स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी केली.

शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी उत्तर देताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) अधिकृत कंत्राटदारांमार्फतच पाठ्यपुस्तके छापते. मात्र नागपूर





येथे संबंधित मुद्रणालयात मोठ्या प्रमाणावर बनावट पुस्तकांची छपाई होत असल्याचे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आले होते. या कारवाईदरम्यान इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या सुमारे २० हजारांहून अधिक बनावट पुस्तकांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधित मुद्रणालयाविरोधात १७ डिसेंबर २०२५ रोजी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित मालकाला अटक करून साठा जप्त करण्यात आल्याची माहिती मंत्र्यांनी दिली.

यासोबतच राज्यातील इतर ठिकाणी अशा प्रकारच्या अवैध छपाईला आळा घालण्यासाठी सर्व खासगी प्रिंटिंग प्रेसची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अधिकृत व बनावट पुस्तकांतील फरक ओळखता यावा यासाठी यावर्षीपासून बालभारतीच्या पुस्तकांवर विशेष क्यूआर कोड छापण्यात येणार असून विद्यार्थ्यांना, पालकांना व पुस्तक विक्रेत्यांना जनजागृतीद्वारे माहिती देण्यात येणार आहे. ■ पान ४ वर

## थापटी तांडा येथे कुलस्वामिनी कला केंद्रावर ग्रामस्थांचा हल्ला

### दगडफेकीत १० ते १२ वाहनांची तोडफोड; ३ ते ४ जखमी







**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील थापटी तांडा शिवारात छत्रपती संभाजीनगरबीड राष्ट्रीय महामार्गालगत सुरू असलेल्या कथित अनधिकृत 'कुलस्वामिनी कला केंद्रा'वर शनिवारी (दि. २८) रात्री सुमारे ११ वाजेच्या सुमारास संतप्त जमावाने हल्ला चढवला. जमावाने तुफान दगडफेक करत कला केंद्राच्या आवारातील १० ते १२ चारचाकी वाहनांची तोडफोड केली. या घटनेत तीन ते चार जण जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रजापूर येथील एका युवकाला कला केंद्रातील काही मद्यधुंद व्यक्तींनी किरकोळ कारणावरून मारहाण केल्याची घटना घडली. ही माहिती गावात पोहोचताच संतप्त झालेल्या सुमारे ३०० जणांच्या जमावाने कला केंद्रावर धडक देत दगडफेक केली.

जमावाने कला केंद्रातील फर्निचर, खुर्च्या, टेबल, सीसीटीव्ही कॅमेरे, खिडक्या, मुख्य लोखंडी दरवाजा तसेच विद्युत उपकरणांची तोडफोड केली. पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या १० ते १२ चारचाकी वाहनांच्या काचा फोडून मोठे नुकसान करण्यात आले. हल्ला सुरू होताच नृत्य कार्यक्रम तात्काळ बंद करण्यात आला. बाहेरगावाहून आलेल्या काही व्यक्तींनी घटनास्थळावरून पळ काढला. दगडफेक आणि हाणामारीमुळे परिसरात मोठी पळापळ उडाली होती. नृत्यांगनांनी स्वतःचा बचाव करण्यासाठी खोलीत आश्रय घेतल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, हे कला केंद्र बंद करण्याच्या मागणीसाठी आडूळ परिसरातील सुमारे वीस गावांतील नागरिकांनी यापूर्वी निवेदने दिली होती. त्या पार्श्वभूमीवरच ही घटना घडल्याची चर्चा आहे.

घटनेची माहिती मिळताच पाचोड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र रात्री उशिरापर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याची नोंद नव्हती. सदर कला केंद्र त्वरित बंद करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणारे

## जोशी महाराज (संत बाळूमामा प्रसन्न)

पत्रिका पाहून तर कोणीही भविष्य सांगू शकतो; परंतु चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणे, ही एक मोठी विद्या आहे. आपले भविष्य कोणत्या क्षेत्रामध्ये कसे आहे, हेसुद्धा सांगितले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही चेहरा पाहून भविष्य सांगतो. मंगलकार्य, व्यवसाय, शेती आणि वास्तुशास्त्राचे भाकित ते त्या-त्या घरातील कुटुंब प्रमुखाचा चेहरा पाहून करतो.

राजकीय क्षेत्रातील अनेकांबद्दल आम्ही सांगितलेले भविष्य खरे ठरले आहे. फिल्मलाईन, राजकीय, सामाजिक, मराठी, हिंदी अभिनेते, उद्योजक आणि बिझनेसमॅन, बिल्डर, रियल इस्टेट, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांचे आम्ही भविष्य सांगितले आहे आणि ते खरेही ठरले आहे. घर, ऑफिस, हॉस्पिटल, कारखाना, हॉटेल यासारख्या जागा मग त्या मालकीच्या किंवा भाडेतत्त्वावर असल्या, तरी आम्ही भविष्य सांगतो. वास्तुदोष, पितृदोष, कालसर्पदोष, नागबळी दोष, नजरदोष इ. दोष टाळण्यासाठी आम्ही उपासनाही सांगतो. इतकेच नव्हे, तर स्त्री- पुरुष यांच्या सर्व समस्यांचे निवारण सांगतात. जमीन, नोकरी, व्यवसाय, संतती, लग्नविवाह आदींसह अन्य अडीअडचणींवर मार्ग सांगतो. कोणत्याही प्रकारच्या कठीण ते अतिकठीण अडचणींवर ते मार्ग सांगून मार्गदर्शन करतो. आतापर्यंत आपण सांगितलेले सर्व भविष्य खरे ठरले आहे, असा आमचा दावा आहे.



राजकीय व व्यावसायिक भविष्य वर्तविणारे
अनुभवसिद्ध ज्योतिषी जोशी महाराज

मु. पो. कडा कारखाना, ता. आष्टी, जि. बीड मो. 9075174343 / 9006239009

## दै. आकर्षण निवडक

### के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



अहिल्यानगर- के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर 'माझी मराठी माझा अभिमान माझी स्वाक्षरी माझी अस्मिता' उपक्रमांतर्गत सर्वांनी आपली स्वाक्षरी मराठीत केली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती मुनोत यांनी कुसुमाग्रजांची कविता सादर केली. कार्यक्रमाचचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. वर्षा कीर्तने यांनी केले. यावेळी विद्यार्थी - विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. स्नेहल बोरावके यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन प्राध्यापक आरती खेडकर यांनी केले.या कार्यक्रमास कार्यालयीन अधीक्षक श्री. संतोष मुनोत, प्रा. डॉ. राहुल थोरात, हर्षाली रासकर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संत गरीब दास जी महाराज यांच्या ३०० व्या बोध दिनानिमित्त रक्तदान शिबिरास प्रतिसाद




अहिल्यानगर- संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे.असे प्रतिपादन संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम धवल पुरी अहिल्या नगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे सदस्य मोहनदास (नागपूर )यांनी केले आहे. सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत गरीब दास जी महाराज यांचा ३०० व्या बोध दिवसानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात १५३ भाविकांनी रक्तदान केले. सत लोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.याप्रसंगी संत रामपाल जी महाराज सेवा कमिटीचे मोहनदास (नागपूर),भगवानदास (पुणे),रमेशदास (नाशिक) उत्तम दास (अहिल्या नगर ),सूरज दास (मुंबई )तसेच जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ.प्रसाद विटकर डॉ. विलास मढीकर, जनसंपर्क अधिकारी , शंकर खंडागळे,मेघा शिंदे,गौरव बागल,पानगावकर, किशोर यादव आदी उपस्थित होते. जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने रक्त संकलनाचे कार्य करण्यात आले.

### पै. नाना डोंगरे यांना पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार जाहीर

अहिल्यानगर- तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या सन्मान सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते डोफ्लगरे यांना पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष जावेद शेख व फारुख शेख नौमानी यांनी दिली. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन डोंगरे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

# नाथषष्ठीनिमित्त पैठणमध्ये महास्वच्छता अभियान

**नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**पैठण–** नाथषष्ठीच्या पावन सोहळ्यानिमित्त पैठण शहरात महास्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान व पैठण नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, मंदिर परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी साफसफाई करण्यात आली. नाथषष्ठी निमित्त शहरात येणाऱ्या भाविकांना स्वच्छ व सुंदर वातावरण मिळावे, या उद्देशाने अभियान हाती घेण्यात आले होते. या उपक्रमात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीची जाणीव दाखवून दिली. पदाधिकारी, व्यापारी बांधव व विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''स्वच्छ पैठण सुंदर पैठण, हीच आपली सामूहिक जबाबदारी,'' असा संदेश देत शहर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मराठी माणसेच मराठी भाषेचे गौरव विधाते – जेष्ठ साहित्यिका प्रा. मेधा काळे

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आम्हा मराठी भाषेला संस्कृतीला हजारो वर्षाची परंपरा आहे. जागतिकीकरणाचे वारे सर्वत्र वाहत असताना आमच्या माय मराठीचे नाव साता समुद्र पार जाण्यासाठी आम्ही मराठी माणसांनीच आपल्या बोलण्यात, वाचण्यात ,लिहिण्यात तिचा अंगीकार केला तर आम्हीच मराठी भाषेचे गौरव विधाते होऊ असा आशावाद जेष्ठ साहित्यिका प्रा. मेधा काळे यांनी व्यक्त केला.

वि वा शिरवाडकर तथा प्रसिद्ध लेखक कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी भाषा गौरव दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित पुस्तक रसग्रहण व चारोळ्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी प्राध्यापिका काळे बोलत होत्या.

कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष प्रा शिरीष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे ,संचालिका शिल्पा रसाळ, संचालक किरण आगरवाल , पुस्तक रसग्रहण व चारोळी स्पर्धेच्या परीक्षक ''रेघोट्याच्या निर्मात्या''सौ साधना कसपटे - महानुर,ग्रंथपाल अमोल इथापे सौ शामल महानूर , सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल ,आदींसह अनेक सभासद,मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्ष प्रा शिरीष मोडक यांनी प्रास्ताविकात ''वाचनालय आणि पुस्तके यांची भाषा संवर्धनात मोठी भूमिका आहे. सुमारे दोन शतके हा वारसा अहिल्यानगर जिल्हा वाचनालय हवेलीतपणे चालू आहे. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन कृतीतून, वाचण्यातून ही माय मराठी समृद्ध करावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

चारोळी स्पर्धेच्या परीक्षिका सौ.साधना कसपटे- महानूर यांनी आपल्या महत्त्वपूर्ण मनोगतात ''आपण सातत्याने पुस्तके वाचले तर आपला शब्द संग्रह, कल्पनाशक्ती व ज्ञान यांनी वाचक समृद्ध होतो. यातूनच पुढे मराठीतून चांगला सुसंवाद, लेखन व आपसुकच मराठी भाषा ही समृद्ध होईल. त्यासाठी आपण रोजच्या जीवनात दर्जेदार पुस्तकांचे वाचन, मराठीचा जाणीवपूर्वक सुसंवाद प्रत्येकाची भूमिका आणि जबाबदारी महत्त्वाची असल्याचे सांगितले.

यावेळी चारोळी स्पर्धेतील विजेते प्रथम -संकेत फाटक ,द्वितीय- तनिषा शाह ,तृतीय- दत्ता पवार ,उत्तेजनार्थ सुरेखा घोलप, अजय शुक्ल ,संजय सोनवणे यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. मान्यवरांचा सन्मान प्रा. शिरीष मोडक ,शिल्पा रसाळ किरण आगरवाल यांच्या हस्ते करण्यात आला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालिका शिल्पा रसाळ यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार अमोल इथापे यांनी मानले.यावेळी स्पर्धेतील स्पर्धक वाचक तसेच वाचनालयाचे कर्मचारी सौ . वर्षा जोशी, श्री.संजय गाडेकर, आर्यन मडूर ,शेख सिकंदर यांचे सहकार्य लाभले.

# श्री गोरक्षनाथ गड मंदिर कलशरोहण सोहळ्याचा प्रारंभ दिंडी सोहळ्याने उत्साहात

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरापासून अवघ्या वीस किलोमीटर अंतरावर असलेल्या मांजरसुंबा येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड मंदिराच्या कलशरोहण कार्यक्रमाचा शुभारंभ दिंडी सोहळ्याने मोठ्या भक्तिभावात व उत्साहात झाला.

या दिंडीसोहळ्यात नाथसंप्रदायाचे हजारो भक्त टाळ-मृदुंग, लेझीम, पताका आणि भगवे झेंडे घेऊन सहभागी झाले. ''जय गोरक्षनाथ''च्या जयघोषात वातावरण दुमदुमले. कलशरोहण मिरवणूक २७ फेब्रुवारीपासून प्रारंभ होऊन २ मार्चपर्यंत विविध गावांतून प्रवास करीत गोरक्षनाथ गडावर आगमन करणार आहे. प्रत्येक गावात भाविकांकडून या पालखीचे स्वागत भक्तिभावाने, फुलांनी आणि नामस्मरणाने करण्यात येत आहे. गावोगावी धार्मिक उत्साह आणि नाथसंप्रदायाची पताका फडकताना दिसत आहे.

कलशरोहण सोहळ्याच्या निमित्ताने २७ फेब्रुवारी ते ७ मार्च दरम्यान विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २ मार्च रोजी दिंडीसोहळा श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर पोहोचणार असून त्यानंतर त्रिदिनीय सप्ताह सोहळ्याची सांगता ७ मार्च रोजी कलश पूजनाने होणार आहे.

कलशरोहण कार्यक्रमानिमित्त आयोजित त्रिदिनीय हरिकीर्तन सप्ताह पुढीलप्रमाणे पार पडणार आहे - ४ मार्च (बुधवार): ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील (मुंबई), ५ मार्च (गुरुवार): ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे (आळंदी), ६ मार्च (शुक्रवार): ह.भ.प. गुरुवर्य जंगले महाराज शास्त्री (डोंगरगाव आश्रम), ७ मार्च (शनिवार): सकाळी १० वाजता गुरुवर्य महंत रामगिरी महाराज (सरला बेट) यांच्या शुभहस्ते कलशपूजन कार्यक्रम व काल्याचे कीर्तन या सर्व कार्यक्रमांमध्ये वारकरी संप्रदायातील संत, कीर्तनकार आणि स्थानिक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या संदर्भात देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शंकरराव कदम आणि सचिव गोरक्षनाथ कदम यांनी माहिती दिली की, श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडाच्या कलशरोहण सोहळ्याच्या निमित्ताने भक्ती, श्रद्धा आणि नाथपरंपरेचा संगम घडत आहे. सर्व नाथभक्त, वारकरी, ग्रामस्थ आणि भाविकांनी या पवित्र सोहळ्यात सहभागी व्हावे व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.

# विज्ञान म्हणजे विचारांची मुक्त उड्डाणे - ठाकूर

**तपोवन रोडवरील एकता महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरातील तपोवन रोड येथील एकता महाविद्यालयात २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे थोर वैज्ञानिक चंद्रशेखर व्यंकट रमण यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी लावलेल्या ' रमण इफेक्ट' या महत्त्वपूर्ण शोधाच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. कार्यक्रमाच्या प्रारंभी सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व विज्ञान क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची उजळणी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून व्याख्यात्या ऋता ठाकूर उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य राजेंद्र मेहेत्रे होते. व्यासपीठावर सायन्स विभाग प्रमुख प्रा. आकांक्षा गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज क्षीरसागर, दिपाली गिरी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्या ऋता ठाकूर यांनी आपल्या भाषणात विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट केले. त्या म्हणाल्या की, विज्ञान हे केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित नसून आपल्या प्रत्येक कृतीत आणि निर्णयात विज्ञान दडलेले आहे. आपण मोबाईल वापरण्यापासून ते आरोग्याची काळजी घेण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर विज्ञानाचा आधार घेतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे विषय म्हणून नव्हे, तर जीवनपद्धती म्हणून पाहावे. संशोधनाची वृत्ती, जिज्ञासा आणि नव्या कल्पनांना स्वीकारण्याची तयारी हीच विज्ञानाची खरी ओळख असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना संशोधनाचा दृष्टिकोन ठेवून प्रत्येक गोष्टीकडे वैज्ञानिक नजरेने पाहण्याचे आवाहन केले. विज्ञानामुळे विचारशक्ती, निरीक्षण क्षमता आणि तर्कशुद्ध निर्णय घेण्याची सवय विकसित होते, असे त्यांनी नमूद केले.

अंधश्रद्धा, गैरसमज आणि चुकीच्या समजुती दूर करण्यासाठी विज्ञानाचा आधार आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी तरुण पिढीने प्रयोगशीलता व नवनिर्मितीची कास धरावी, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान विज्ञान विषयक पोस्टर स्पर्धा तसेच विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित आकर्षक पोस्टर्स सादर करत विज्ञानातील विविध शोध, पर्यावरणीय समस्या, अंतराळ संशोधन आणि तंत्रज्ञानातील प्रगती यांचे प्रभावी सादरीकरण केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले ज्ञान आणि तयारीचे दर्शन घडवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आकांक्षा गायकवाड यांनी केले सूत्रसंचालन प्रा. कविता वाकडे तर आभार चेतना आदमाने यांनी मानले.

# श्री समर्थ मंडळाचे आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार वितरण समारंभ



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कुलोपाध्याय म्हणजे एक ज्ञानी,कर्तृत्वान महात्मा की जो आपल्यासाठी आणि दुसऱ्यासाठी देहत्याग करणारा व्यक्ती तो कुलोपाध्याय असतो त्या कुलाचे संपूण आयुष्य वृध्दीगंत कसे होईल यांच्यावरती प्रकाश टाकणारा एक थोर कुटुंबाचा महात्मा असतो वेळावेळी कार्यक्रम, सोहळयात जो संकल्प सोडला जातो कुलोपाध्याय हा वेळोवेळी कुटुंबाकरीता करत असलेल्या संकल्पातून दिसून येत असत कुलोपाध्यायच्या मनात त्या कुटुंबाकरीता किती अंत्यितक भाव असतो तो वेळावेळी आपल्याला त्या संकल्पातून दिसून येत असतो तो आनंद जसा त्या कुटुंबाला मिळत जातो तितकाच आनंद कुलोपाध्यायाला मिळत असतो या माध्यमातून अश्या पुरोहितांचा सन्मान होत असून कै. सिध्देश्वर एकनाथ तथा सिदूकाका धर्माधिकारी घराण्याचा लौकीक वाढत आहे. असे प्रतिपादन ह.भ.प. निळकंठ देशमुख यांनी केले.

श्री समर्थ मंडळ ऋग्वेद भवन अहिल्या नगर यांच्या वतीने व कै. सिध्देश्वर एकनाथ तथा सिदूकाका धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वरी निरूपणकार ह.भ.प. नीळकंठ देशमुख हे होते. श्री समर्थ मंडळ यांच्या वतीने दिला जाणारा आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार या वर्षी कल्पतरू मठाचे मठाधिपती वे.शा.सं विनायक धर्माधिकारी व वे. शा.सं. सागर कुलकर्णी ( घनपाठी ) यांना ज्ञानेश्वरी निरूपणकार ह.भ.प. नीळकंठ देशमुख यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. श्री समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश अ. क्षीरसागर,सौ.धर्माधिकारी,सौ.कुलकर्णी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

वे.शा.सं विनायक धर्माधिकारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले परंपरा आणि कुलोपाध्याय हे जे नात आहे भारतीय संस्कृतीचे अभिन्य अंग आहे या ज्या परंपरा आहेत कुलाचार कुलोपाध्याय ही संकल्पना पावत चालली आहे यामुळे अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होत आहेत आजच्या काळातही कुलोपाध्याय हे भारत सरकारमध्ये विशिष्ट पदावर आहेत लोपत पावत चालले कुलधर्म व कुलाचार जागवायचे असतील तर कुलपरंपरेचा सन्मान करायचा असेल तो कुलोपाध्याय सांगू शकतो तो तुमच्या अडीअडचणीत उभा राहू शकतो त्यांच्या मागे अध्यात्मिक बल असते असे शास्त्र सांगते ज्यांच्या नावाने हा सन्मान मिळत आहे त्यांचा हा कृपाशिर्वाद आहे म्हणून आम्ही तो ग्रहण करतोय.

सौ. धर्माधिकारी आणि सौ. कुलकर्णी यांचा सत्कार सौ. बेदरे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्तविक समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश अ. क्षीरसागर यांनी केले. दोन्ही पुरस्काथीचा परीचय समथ मंडळाचे विश्वस्त मिलिंद जोशी यांनी करून दिला. ह.भ.प. नीळकंठ देशमुख यांचा परीचय समथ मंडळाचे खजिनदार पुरूषोत्तम बेदरे यांनी करून दिला. धर्माधिकारी परीवाराचे मनोगत हेमंत धर्माधिकारी यांनी पुरस्कारामागची भूमिका मांडली. कार्यक्रमास व मोठया संख्येने पुरोहित वर्ग व सभासद उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त दोन्ही गुरुजींनी आपले मनोगत व्यक्त केले. मानपत्र लेखन व वाचन ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.सूत्रसंचालन समथ मंडळाचे सचिव महेश रा . कुलकर्णी यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व कार्यकारणी सदस्यांनी खूप प्रयत्न केले. सौ. स्नेहल उपाध्ये यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. आभार समथ मंडळाचे विश्वस्त रविंद्र कुलकर्णी यांनी केले.

खजिनदार पुरूषोत्तम बेदरे, कार्यकारिणी सदस्य रविंद्र कुलकर्णी, यशवंत आंबेकर, मिलिंद जोशी, माजी नगरसेवक भैय्या गंधे, वे. शा. सं. चकोर मुळे, बंडोपंत मुळे, रेखी गुरू,जोशी गुरू, प्रदुम्न जोशी,सोमनाथ मुळे,ॲड अच्युतराव पिंगळे,धर्माधिकारी आणि कुलकर्णी परीवाराचे नातेवाईक तसेच मुकुल गंधे,अनंत कुलकर्णी,वाल्मीक कुलकणी,सौ. कालिंदी केसकर,रविंद्र धर्माधिकारी,उपेंद्र धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

# सचिन घायाळ यांच्याविरोधात १६ कोटींच्या अपहाराचा गुन्हा

**गहाण खत करून कर्ज उचलल्याचा आरोप; एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**पैठण–** शिवसेना उपनेते (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) सचिन विक्रमराव घायाळ यांच्याविरोधात तब्बल १६ कोटी ६२ हजार रुपयांच्या अपहारप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या विस्ताराच्या नावाखाली दिशाभूल करून बँकेकडून कर्ज उचलल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

फिर्यादी सुरेश पंडित काकडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कारखान्याची मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेतले व संबंधित रकमेचा अपहार केल्याचे नमूद करण्यात आले आहे. भारतीय दंड संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक इश्वर जगदाळे अधिक तपास करीत आहेत.

तक्रारीत म्हटले आहे की, कारखान्याच्या आधुनिकीकरण व विस्तारासाठी कर्ज घेतले असले तरी त्या निधीचा विनियोग इतरत्र केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे कारखान्याचे सभासद, शेतकरी व कामगारांमध्ये खळबळ उडाली आहे.

दरम्यान, आमदार विलास भुमरे यांनी प्रतिक्रिया देताना, ''संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याशी संबंधित शेतकरी, सभासद व कामगारांवर अन्याय होत असेल तर तो सहन केला जाणार नाही. याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे आहे,'' असे म्हटले. तर सचिन घायाळ यांनी आरोप फेटाळून लावत, ''हा गुन्हा पूर्णपणे राजकीय प्रेरित असून माझी बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. योग्य वेळी सर्व तथ्ये समोर मांडली जातील,'' असे स्पष्ट केले. या प्रकरणाची सध्या एमआयडीसी पोलिसांकडून चौकशी सुरू असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबावदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात




अहिल्यानगर - २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त उद्धव अकॅडेमी संलग्न श्री चैतन्य टेक्नो स्कूल, अहिल्यानगर येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या प्रदर्शनात इयत्ता विविध वर्गांतील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रात्यक्षिकांसह सहभाग नोंदवत आपली कल्पकता आणि अभ्यासू वृत्तीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युनिकॉर्न अकॅडेमीचे संचालक मंगेश तवले होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. के. ॲन्सी, अकॅडेमिक डीन के. सुमन, बीडीएम शशिकुमार, शिक्षकवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या वतीने मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रदर्शनात विज्ञान, गणित, भूगोल, जीवशास्त्र आदी विषयांवरील विविध प्रकल्प विद्यार्थ्यांनी मांडले होते. पर्यावरण संवर्धन, सौरऊर्जा, जलसंधारण, मानवी शरीररचना, गणिती संकल्पनांचे मॉडेल्स अशा अनेक विषयांवरील प्रकल्पांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्ण भाषाशैलीत आपल्या प्रकल्पांचे सुस्पष्ट स्पष्टीकरण देत परीक्षक व पाहुण्यांची प्रशंसा मिळवली. उत्कृष्ट प्रकल्पांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. बीबी यावेळी मार्गदर्शन करताना मंगेश तवले म्हणाले की, विज्ञान हाच जीवनाचा खरा आधार आहे. आजचे युग हे वैज्ञानिक युग असून आधुनिक विचारसरणी व वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय प्रगती शक्य नाही. जुन्या रूढी-परंपरांच्या पलीकडे जाऊन तर्कशुद्ध विचार करणे ही काळाची गरज आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रकल्प आणि त्यांचे आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण पाहून मी भारावून गेलो आहे. मुख्याध्यापिका सौ. ॲन्सी यांनी आपल्या मनोगतात शाळा व्यवस्थापन व शिक्षकवृंद विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, निरीक्षणशक्ती व सृजनशीलता विकसित होत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### पैलवान प्रियज करपेला थायलंडमध्ये आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत रौप्य पदक



अहिल्यानगर - मेहेकरी (ता. नगर) येथील कुस्तीपटू पैलवान प्रियज संतोष करपे याने थायलंड येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्य पदक पटकाविले. या उल्लेखनीय यशाबद्दल ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी पैलवान करपे याचा सत्कार केला. यावेळी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्कार समारंभात प्रियज करपे याच्या जिद्दीचा, परिश्रमांचा आणि चिकाटीचा गौरव करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल आणि हलाखीच्या परिस्थितीतून स्वतःच्या मेहनतीच्या बळावर आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. पैलवान करपे हा मेहेकरी येथील क्रीडा लक्ष्य तालिममध्ये वस्ताद तात्या करपे यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचा सराव करत आहे. ॲड. गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, प्रियज करपे याने परिस्थितीवर मात करुन कुस्ती क्षेत्रात केलेली कामगिरी प्रेरणादायी आहे. हलाखीच्या परिस्थितीतूनही जिद्द, सातत्य आणि प्रामाणिक मेहनत यांच्या जोरावर आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचता येते, हे प्रियजने सिद्ध करून दाखवले आहे. आजच्या युवकांनी मोबाईल आणि आभासी दुनियेपासून दूर राहून क्रीडा, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात स्वतःला झोकून द्यावे.

# दाते सरांच्या माध्यमातून हिवरे कोरडा येथे विकासकामांची गंगा अवतरली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**हिवरे कोरडा –** हिवरे कोरडा येथे राममा-२२२ धोत्रे बुद्रुक हिवरे कोरडा प्रतिमा ५० जोड रस्ता (ग्रामा-४०) या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरण कामाचे भूमिपूजन पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

आमदार दाते यांच्या माध्यमातून हिवरे कोरडा गावात आतापर्यंत विविध विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून रस्ते, पायाभूत सुविधा तसेच इतर कामांमुळे गावाच्या विकासाला मोठी चालना मिळाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर रस्त्याच्या कामामुळे धोत्रे बुद्रुक, हिवरे कोरडा तसेच परिसरातील नागरिकांना वाहतुकीस मोठी सुविधा उपलब्ध होणार असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष हरीश काका दावभट, भाजप सरचिटणीस सुभाष दुधाडे, नगरसेवक संदीप जऱ्हाड, चेअरमन बाळासाहेब कोरडे, बाबू कोरडे, सुदाम कोरडे, संतोष अडसूळ, युवा नेते संदीप कोरडे, भाजप नेते बबन वाळुंज, युवा राष्ट्रवादी अध्यक्ष अमोल अडसूळ, बाळू सुकदेव अडसूळ, मल्हारी कोरडे, भाऊ गोळे, शिवाजी दळवी, नितीन नरसाळे, अशोक कावरे, विकास जऱ्हाड, सचिन जऱ्हाड, रामदास जऱ्हाड, राज कोरडे, नितीन वाळुंज, दत्तात्रय जाधव, बाबाजी अनारसे, अंबादास वाळुंज, बाळासाहेब घंगाळे, मुरलीधर कावरे, माधव जऱ्हाड, भूषण जऱ्हाड, कारभारी जऱ्हाड, गणेश जऱ्हाड, अंकुश वाळुंज, पानमंद सर, विनायक जऱ्हाड, भाऊसाहेब जऱ्हाड, सुदर्शन कोरडे, आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **''हिवरे कोरडा येथे प्रथमच कोट्यावधी रुपयांच्या विकासकामांना गती मिळाली आहे. आमदार दाते सरांच्या माध्यमातून गावात रस्ते व दळणवळणाच्या सुविधा मोठ्या प्रमाणात सुधारल्या असून गावाचा चेहरा-मोहरा बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात विकासकामे गावाच्या इतिहासात प्रथमच होत असल्याने आम्ही सर्व ग्रामस्थ आनंदी आणि समाधान व्यक्त करत आहोत.'' प्रथमच असे आमदार आम्हाला लाभले आम्ही भाग्यवान समजतो.**
>
> **युवा नेते संदीप कोरडे**

# येरवडा खुले कारागृहात जागतिक आध्यात्मिक गुरूंचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**सकारात्मकता, आत्मजागर आणि अंतर्मुक्तीचा परिवर्तनशील सकाळचा सत्संग**



**पुणे । वृत्तसंस्था–** मा. डॉ. श्री. सुहास वारके (भा.पो.से.) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच श्री सुनील ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली आज दिनांक १ मार्च, २०२६ रोजी येरवडा खुले कारागृह येथे एका प्रेरणादायी आणि उन्नत करणाऱ्या सत्संगाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे शांत वातावरणातील कारागृह परिसर आत्मचिंतन, सकारात्मकता आणि अंतर्जागृतीचे केंद्र बनले.

या कार्यक्रमास पूज्य जैन आध्यात्मिक गुरू पूज्य गुरुदेव श्री फूलचंदजी शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी सकारात्मक विचारसरणी, आत्मजागरूकता, कर्मबंधनातून मुक्ती आणि परम अंतःशांती प्राप्त करण्याचा मार्ग या विषयांवर बंद्यांना अत्यंत प्रभावी व हृदयस्पर्शी मार्गदर्शन केले. आपल्या प्रवचनात गुरुदेवांनी स्पष्ट केले की, खरे स्वातंत्र्य हे केवळ शारीरिक मुक्तता नसून अज्ञान, नकारात्मक विचार आणि संचित कर्मबंधनातून मुक्त होण्यात आहे. त्यांनी कैद्यांना त्यांच्या सध्याच्या परिस्थितीकडे आत्मशुद्धी आणि आध्यात्मिक उन्नतीची संधी म्हणून पाहण्याचे आवाहन केले.

गुरुदेवांनी पवित्र जैन ग्रंथ आत्मसिद्धि शास्त्र याच्या अभ्यास व प्रचार चळवळीची स्थापना जगातील २२७ देशांमध्ये, त्यात १९१ संयुक्त राष्ट्र सदस्य देशांचा समावेश आहे, अशा व्यापक पातळीवर केली आहे. आत्मसाक्षात्कार, सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक आचरणाचा संदेश त्यांनी जागतिक स्तरावर पोहोचविला आहे.सत्संगादरम्यान वातावरण अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी होते. कैद्यांनी मोठ्या आनंदाने आणि कृतज्ञतेने प्रतिसाद दिला. कैद्यांच्या सकारात्मक प्रतिसादाने प्रभावित होऊन अधीक्षक शामकांत शेडगे यांनी गुरुदेवांचे आभार मानले आणि भविष्यातही अशा मार्गदर्शनासाठी पुनः भेट देण्याचे सस्नेह आमंत्रण दिले.या कार्यक्रमाने खुल्या कारागृह व्यवस्थेच्या सुधारात्मक तत्त्वज्ञानाला अधोरेखित केले, जिथे केवळ शिस्त नव्हे तर पुनर्वसन, नैतिक उन्नती आणि अंतर्मुख जागृती यांवर भर दिला जातो.या सकाळी एक ठाम संदेश दिला कारागृहाच्या भिंतींच्या आतही ज्ञानाचा प्रकाश हृदय उजळवू शकतो, जीवन बदलू शकतो आणि आत्म्याला खऱ्या मुक्तीकडे नेऊ शकतो.या कार्यक्रमाला श्री फुलचंद शास्त्री गुरुजी, कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे, जयेश शाह, नीता शाह, आनंद बागरेचा, संगीता बागरेचा, गौतम बागरेचा, हेत शाह वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, सुभेदार दत्तात्रय चव्हाण, सुनील गायकवाड, बालाजी सावंत, हवालदार राजेंद्र धनगर, महेश हळदकर, शैला कदम, महेंद्र लोहकरे, विजयकुमार दिवेकर, संतोष शिनगारे व कारागृहातील बंदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यिकांनी प्रतिभेचा वापर समाजासाठी करावा - कॉ.सुरेश पानसरे

**शब्दगंधची राहाता तालुका शाखा कार्यकारिणी जाहीर**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**धामोरी–** साहित्यिकांनी गटतटाचे राजकारण वगळून साहित्याशी प्रामाणिक राहून कार्यरत राहावे, सामाजिक प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर लेखन करावे आणि आपल्या प्रतिभेचा वापर समाजहितासाठी करावा, असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ.सुरेश पानसरे यांनी केले.

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या राहाता तालुका शाखा कार्यकारी मंडळाच्या निवड प्रसंगी लोणी येथील संकल्प मंगल कार्यालयात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. सोपानराव विखे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, नियोजन समिती प्रमुख बबनराव गिरी व शर्मिला गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत राहाता, शिर्डी व लोणी परिसरातील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत राहाता तालुका शाखेच्या अध्यक्षपदी साहेबराव तुपे, सचिवपदी सुमेध ब्राह्मणे यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी प्रा. डॉ. संदीप तपासे, उपाध्यक्षपदी सुयश वाघमारे, खजिनदारपदी विजय तांबे यांची निवड झाली. मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. सोपानराव विखे, भास्कर दादा लगड, संतोष ब्राह्मणे, भास्करराव निर्मळ तसेच कॉ.सुरेश पानसरे यांची निवड करण्यात आली.

यावेळी साहेबराव तुपे यांनी नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच शिर्डी येथे तालुकास्तरीय काव्य संमेलन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली. प्रा. सोपानराव विखे म्हणाले की, कोणत्याही सोयी-सुविधा नसताना शब्दगंधने गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने विविध उपक्रम राबवले आहेत. या कार्यातून अनेक नवोदित लेखक घडले असून ही चळवळ विस्तारत असल्याचे पाहून समाधान वाटते. शब्दगंधच्या विविध उपक्रमांची माहिती सुनील गोसावी यांनी दिली, तर सुमेध ब्राह्मणे यांनी आभार प्रदर्शन केले. नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, राज्य संघटक प्रा. डॉ. अशोक कानडे, कार्यवाह भारत गाडेकर ,खजिनदार भगवान राऊत व मुंबई जिल्हा प्रतिनिधी प्रा. डॉ.रमेश वाघमारे यांनी विशेष अभिनंदन केले.

# शिक्षणाबरोबर संस्कार ही महत्वाचे – उद्योजक दिपक लांडगे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शाळेत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाबरोबर पालकांनी विद्यार्थ्यांना संस्कार देखील दिले पाहिजेत असे प्रतिपादन वाघेश्वरी मिल्क प्रक्रिया उद्योग समुहाचे अध्यक्ष दिपक लांडगे यांनी व्यक्त केले. पारगाव येथील डॉ शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव प्रा विजय शिंदे, उपाध्यक्ष अशोक शिंदे, ईश्वर तनपुरे, संपत गुंड, तानाजी गुंड, शाम लांडगे पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लांडगे पुढे म्हणाले कि पालकांनी देखील विद्यार्थांना वेळ देणे गरजेचे आहे. वेळेची हि गुंतवणूक म्हणजे आपले निवृत्तीनंतरचे आयुष्य चांगले जाण्याची हमी आहे. यावेळी विविध स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना लांडगे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. प्रा शिंदे यांनी प्रास्ताविक तसेच शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी विद्यार्थ्यांनी गणेशवंदना, पोवाडा, लावणी, देशभक्तीपर गीते यावर बहारदार सादरीकरण केले. तसेच रॅम्प वॉक करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमासाठी दिपाली त्रिमुखे, प्रिती कुमटकर यांनी नियोजन केले तर सहदेव शिर्के, नवनाथ इंगोले यांनी सहकार्य केले.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये मराठी राजभाषा दिनानिमित्त संस्कृतीचा जागर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून शहरातील सेंट विवेकानंद प्राथमिक शाळेत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात छोटेखानी सांस्कृतिक सादरीकरणाने झाली. विद्यार्थ्यांनी ''सर्वात्मका शिवसुंदरा'' हे गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. पारंपरिक लोककला प्रकार असलेले भारुड सादर करत त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली, तर ''गंगुबाई'' या एकपात्री लघुनाट्याने उपस्थितांची विशेष दाद मिळवली. मायरा शेख हिने मराठी राजभाषा दिनाची माहिती सादर केली, तर भाग्यश्री नारंग हिने आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनिष्का मिश्रा व हम्मद शेख या विद्यार्थ्यांनी केले.




याप्रसंगी बोलताना मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची राजभाषा मराठी जपण्याचे व तिचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

यानंतर ''महाराष्ट्राची खाद्य संस्कृती'' या विशेष उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल उभारले. या उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार श्री. दामोदर माखिजा तसेच व्यवस्थापन समिती सदस्य श्री. महेश मध्यान, श्री. सुरेश हिरानंदानी, श्री. राजू गुरुनानी तसेच मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोधर माखिजा, विश्वस्त श्री. महेश मध्यान, श्री. सुरेश हिरानंदानी, श्री. राजकुमार गुरुनानी, श्री. हरेष मध्यान तसेच प्राचार्या सौ. गीता तांबे व मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी या उपक्रमाचे अभिनंदन करून सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांना मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

आपला भारत देश हा विविधतेने नटलेला आहे. विविध प्रांतांची आपली एक वेगळी ओळख व वैशिष्ट्ये आहेत. तसेच आपल्या महाराष्ट्राचेही पोशाख, खाद्यसंस्कृती, परंपरा यांमुळे स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. मराठी खाद्यसंस्कृतीमध्ये पुरणपोळी, मोदक, पिठलं-भाकरी, थालीपीठ, शिपी आमटी, सुरळीची वडी, घुगऱ्या, कोकम सरबत, मठ्ठा, लापशी, कोथिंबीर वडी, सुरईची वडी, सोलकढी, तांबूल असे अनेक पारंपरिक व पौष्टिक पदार्थ आढळतात.

# पैठणमध्ये गोदावरी नदीप्रदूषणाला लगाम; उर्वरित दोन नाले बंद करण्याची मागणी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण –** शहरातील नाल्यांमधून थेट गोदावरी नदी पात्रात मिसळणाऱ्या सांडपाण्याच्या प्रश्नावर प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत सहा प्रमुख नाल्यांचे सांडपाणी कायमस्वरूपी वळवले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने नदीपात्रातील प्रदूषणात घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

नगरपरिषदेकडून उभारण्यात आलेल्या व्यवस्थेनुसार, विविध भागांतील सांडपाणी 'वेटवेल'मध्ये संकलित करून पंपिंगद्वारे सुरक्षित स्थळी वळवले जात आहे. भविष्यात या पाण्यावर प्रक्रिया करून ते शेती व बिगर-पिण्याच्या कामांसाठी वापरण्याचीही योजना आहे. त्यामुळे नदीचे पावित्र्य राखण्यास मदत होणार असून पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळणार आहे. दरम्यान, शहरातील काही भागांतील उर्वरित सांडपाणी नाल्यांबाबत नागरिकांकडून अजूनही लक्ष वेधले जात आहे. विशेषतः मौलाना साहेब दर्ग्याच्या पाठीमागून जाणारा एक सांडपाणी नाला तसेच पत्रकार हारून शेख यांच्या घराजवळून जाणारा दुसरा नाला बंद करून त्याचे पाणीही पर्यायी व्यवस्थेत वळवण्यात यावे, अशी मागणी पुढे येत आहे. हे दोन्ही नाले पूर्णपणे बंद करून सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेकडे वळवले तर गोदावरी नदीपात्र अधिक स्वच्छ राहील आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पाणी उपलब्ध होईल, असे मत व्यक्त केले जात आहे.

# श्री ढोकेश्वर विद्यालयात, मराठी राजभाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टाकळी ढोकेश्वर येथे मराठी राजभाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी होते.

याप्रसंगी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज आणि डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज व डॉ. सी. व्ही. रमण यांच्या कार्याविषयी आपल्या भाषणातून माहिती दिली. विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मराठी राजभाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. व कुसुमाग्रज यांची ''माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा'' या कवितेचे गायन केले व विज्ञानाचा पोवाडा सादर केला. कला शाखेचे समन्वयक प्रा. विजय सोबले व प्रा. भाऊसाहेब हिंगडे, निलेश जासूद यांनीही आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचे दुरुपयोग या विषयावर नाटिका व एकनाथ महाराजांचे अंधश्रद्धेवरील भारुड सादर केले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीम. मनीषा गाडगे, श्री. संदीप महांडुळे, श्रीरंग धामणे, वैशाली गायखे, अतुल सैद, अनिता म्हस्के, सुमन वाळुंज, विष्णू भद्रे, मिनाक्षी पवार, वैशाली ढोकळे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीम. कल्पना जाधव यांनी केले. सूत्रसंचालन श्रीम. सोनल रोहोकले, व श्रीम. प्रिया डव्हणे यांनी केले. मल्हारी वाघस्कर यांनी आभार मानले.

# राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची ३४ वी पुण्यस्मृती

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे ४ ते ३० मार्च दरम्यान मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन

## अँजिओग्राफी ३ हजार, एमआरआय २५०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपयात, सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मार्च २०२६ मध्ये महिनाभर विविध मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली दि. ४ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत हे शिबिरे होतील. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे यंदा रौप्य महोत्सवी वर्षे आहे. हॉस्पिटलला एन.ए.बी.एच.मान्यता मिळालेली असून ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेडस्‌चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमध्ये जागतिक दर्जाच्या सिमेन्स कंपनीचे एमआरआय १.५ टेस्ला मशीनव्दारे तपासणी २५०० रुपये, सिमेन्स ९६ स्लाईस सिटी स्कॅन मशीनव्दारे तपासणी १२५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, डिजीटल एक्स रे तपासणी २५० रुपयात उपलब्ध आहे. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिन कक्ष, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे.

बुधवार दि. ४ मार्च रोजी स्त्रीरोग व गर्भवती माता तपासणी शिबीर होईल. यात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भ पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपये पॅकेज, सिझेरियन १० हजार रुपयात केले जाईल. शिबिरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना सोनोग्राफी, रक्त, लघवी इत्यादी तपासण्या ५० टक्के सवलतीत केल्या जातील. शिबिरापासून पुढे एक महिना या सवलतीचा लाभ मिळेल. शिबिरात सहभागी होणाऱ्या महिलांना बाळंतपणावेळी बिलात ५० टक्के सवलत दिली जाईल. यासाठी सवलत कार्ड असणे आवश्यक आहे. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे, डॉ.कृतिका पाटील रूग्ण तपासणी करतील.

गुरूवार दि. ५ मार्च रोजी सवलतीच्या दरात जनरल सर्जरी शिबीर होईल. यात ॲपेंडिक्स इंटरव्हल, इंगवायनल हर्निया शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपये, हायड्रोसिल शस्त्रक्रिया ४ हजार रुपयांत केली जाईल. औषध खर्च वेगळा असेल. जनरल सर्जन डॉ. प्रविण मुनोत, डॉ.विवेक भापकर रूग्ण तपासणी करतील.

रविवार दि.८ मार्च रोजी कॅन्सर तपासणी शिबीर होईल. यात घसा, फुफ्फुस, आतडे, तोंड इ. कॅन्सर तपासणी होईल. स्त्रियांचे कॅन्सर तपासणी अंतर्गत मॅमोग्राफी मशीनव्दारे स्त्रियांच्या स्तनांची कॅन्सर तपासणी होईल. गर्भ पिशवीच्या कॅन्सर तपासणी व निदानासाठी सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी करण्यात येईल. ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटिव्ह कॅन्सर उपचार, सिम्टोमॅटिक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इ.सुविधा अल्प दरात उपलब्ध आहेत. मॅमोग्राफी तपासणी १०० रुपयात केली जाईल. कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे, कॅन्सर फिजिशियन डॉ.तुषार मुळे, कॅन्सर विकार तज्ज्ञ डॉ. लिझा बलसारा, फिजिशियन डॉ. गजेंद्र गिरी, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरूडे, रेडिओलॉजीस्ट डॉ.मितेश कटारिया, डॉ.भक्ती फलके, डॉ.सोनाली सोलट, डॉ.निखिता जैन-कटारिया, पॅथोलॉजीस्ट डॉ. मुकुंद उंडे, डॉ.सारिका झरेकर, मायक्रोबायोलॉजीस्ट डॉ.नरेंद्र पाटील रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.



बुधवार दि.११ मार्च रोजी त्वचारोग तपासणी शिबीर होईल. यात त्वचा ॲलर्जी, पांढऱ्या डागावरील उपचार, इसब, गजकर्ण, नायटा, केस, नखांच्या समस्या, सोरायसीस, चामखीळ, मसवरील उपचार, कुष्ठरोग इ. तपासणी व उपचार केले जातील. त्वचारोग तज्ज्ञ डॉ.विजया एरंडे रूग्ण तपासणी करतील.

शुक्रवार दि.१३ मार्च रोजी ब्लड प्रेशर, मधुमेह व इतर आजार तपासणी व निदान शिबीर होणार आहे. यात साथीचे आजार व सर्व रोग निदान तपासणी करण्यात येईल. एम.डी.मेडीसीन डॉ.वसंत कटारिया, डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.प्राजक्ता पारधे, डॉ.स्वप्निल शिंदे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

शनिवार दि.१४ मार्च रोजी एंडो युरोलॉजीकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) स्टोन शस्त्रक्रिया शिबीर होईल. यात प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, महिलांचे मूत्र मूल्यमापन व व्यवस्थापन, मूत्र मार्गातील विकार, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन इ. तपासणी होईल. प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातील. मूत्रविकार शल्यचिकित्सक डॉ.संकेत काळपांडे, डॉ.अमेय सांगळे, डॉ.स्वनित देशपांडे रूग्ण तपासणी करतील.

रविवार दि.१५ मार्च रोजी भव्य हृदयरोग तपासणी व हृदय शस्त्रक्रिया शिबीर होईल. बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजवणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया केल्या जातील. अँजिओप्लास्टी व सर्व शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत केल्या जातील. ॲन्जिओग्राफी ३ हजार रुपयांत केली जाईल. कार्डियाक सर्जन डॉ.स्वप्निल कर्णे, डॉ.श्रीरंग रानडे, डॉ.इम्रान पटेल, डॉ.देखणे, डॉ.अगस्थी, एम.डी.मेडिसीन डॉ.वसंत कटारिया, डॉ.विनोद चिंधे, कार्डिओलॉजीस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ.अमित थोपटे, डॉ.विनोद चिंधे, डॉ.अनिकेत कटारिया, कार्डियाक ॲनेस्थेटिस्ट डॉ.विनय छल्लाणी, एमडी मेडिसीन डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.प्राजक्ता पारधे, डॉ.स्वप्निल शिंदे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

सोमवार दि.१६ मार्च रोजी किडनी आजार तपासणी शिबीर होईल. यात अंगावर सूज येणे, लघवी कमी होणे, लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस इ.उपचार केले जातील. किडनी ट्रान्सप्लांट मार्गदर्शन करण्यात येईल. प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत डायलेसिस मोफत केले जाईल. नेफ्रोलॉजीस्ट डॉ.गोविंद कासट, फिजिशियन डॉ.प्राजक्ता पारधे रूग्ण तपासणी करतील.

मंगळवार दि.१७ मार्च रोजी मेंदू विकार तपासणी शिबीर होईल. डोकेदुखी, अपस्मार, पक्षाघात, कंबर दुखी, नसांचे विकार, स्नायूंचे विकार, मेंदू जंतु संसर्ग, मेंदू ज्वर, स्मृतीभ्रंश इ.आजारांची तपासणी होईल. ईईजी, ईएमजी, एनसीव्ही इ.तपासण्या ५० सवलतीच्या दरात केल्या जातील. मेंदू, मणके, मज्जारज्जू संबंधित आजार तपासणी, ट्रॉमा सर्जरी, मेंदूतील रक्तस्त्राव, स्लीपडिक्स (मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे इत्यादीवर उपचार व शस्त्रक्रिया), लहान मुलांमधील फिट, मेंदू विकार, मतिमंदता, गतिमंदता, स्वमग्नता, आनुवांशिकता, अतिचंचलपणा इ.आजारांची तपासणी करण्यात येईल. न्यूरोलॉजीस्ट डॉ.अव्दैत गिते, डॉ.वैशाली कदम, लहान मुलांचे मेंदू विकार तज्ज्ञ डॉ.स्नेहा म्हस्के रूग्ण तपासणी करणार आहेत.

बुधवार दि.१८ मार्च रोजी प्लॅस्टिक सर्जरी शिबीर होईल. लहान मुलांच्या जन्मजात हातांच्या समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुन्या जखमा, पायाच्या जखमा, हातांच्या नस संबंधित आजार, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण इ. उपचार, तोंड, गाल, ओठ, जीभ, जबडा, मान, सायनस, लाल ग्रंथीच्या साध्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार, तोंडातील लाल, पांढरे चट्टे, तिखट व मसालेदार खाण्यातील अडचणी, तोंडाचे व्रण इ. उपचार मार्गदर्शन केले जाईल. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील. प्लॅस्टिक सर्जन डॉ.आदित्य दमानी, डॉ.मृदुला मुळे रूग्ण तपासणी करतील.

शुक्रवार दि.२० मार्च रोजी श्वसनविकार तपासणी शिबीर होईल. फुफ्फुसाचे आजार, दमा, खोकला, ॲलर्जी इत्यादीवर उपचार केले जातील. श्वसन विकार तज्ज्ञ डॉ.स्नेहा तिरपुडे, डॉ.प्रणाली त्रिमुखे रूग्ण तपासणी करतील.

मंगळवार दि.२४ मार्च रोजी अस्थिरोग तपासणी, मणके, सांधेबदली शस्त्रक्रिया व फिजिओथेरपी शिबीर होईल. संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण (गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह) प्रत्येकी ६५ हजार रुपये पासून पुढील दरात होईल. औषध खर्च वेगळा असेल. गुडघेदुखी (टिकेआर पुनर्वसन), संपूर्ण गुडघा रिप्लेसमेंट रिहॅबिलिटेशन, फ्रोजन शोल्डर, मानदुखी, पाठ दुखी, फ्रॅक्चर नंतरचे पुनर्वसन, बेल्स पाल्सी व चेहऱ्याचा कमकुवतपणा, पक्षाघात उपचार केले जातील. अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. विशाल शिंदे, डॉ.रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन डॉ.अमित सुराणा, डॉ.अक्षय गादिया, डॉ.श्रीकांत दलाल, फिजिओथेरपीस्ट डॉ.अनुजा शिवणेकर-देशपांडे, डॉ.आराधना अरवडे, डॉ. अभय साठे रूग्ण तपासणी करतील.

बुधवार दि.२५ मार्च रोजी कान, नाक, घसा तपासणी शिबीर होईल. स्पिच थेरपी, तपासणी व मार्गदर्शन केले जाईल. ऑडिओमेट्री सुविधा उपलब्ध आहे. तज्ज्ञ डॉ.सुकेशिनी गाडेकर, डॉ.अतुल तुपे, वाचा व भाषा उपचार तज्ज्ञ डॉ. अझहर शेख, डॉ.सूरज कर्डिले रूग्ण तपासणी करतील.

शुक्रवार दि.२७ मार्च रोजी बालरोग तपासणी शिबीर होईल. नवजात शिशुंच्या सर्व आजारांवर निदान व उपचार, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, हर्निया, डायाफ्रामॅटिक हर्निया, फायमोसीस, हायड्रोसील, अर्नाडसेंडेड टेस्टिस तपासणी केली जाईल. बालरोग तज्ज्ञ डॉ.वैभवी वंजारे, डॉ.दीपी अग्रवाल, डॉ.विजय साठे, डॉ.गणेश गव्हाणे, पिडियाट्रिक सर्जन डॉ.रुपेश सिकची रूग्ण तपासणी करतील.

रविवार दि.२९ मार्च रोजी मोफत नेत्ररोग तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर होईल. भगवान महावीर भवन येथील आनंदऋषीजी नेत्रालयात हे शिबीर होईल. शिबिरात नाव नोंदणीसाठी संपर्क : ८६८६४०१५१५. नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.अशोक महाडिक, डॉ.संदीप राणे, डॉ.प्रतिक कटारिया, डॉ.विशाल तांबे, डॉ.किरण शिंदे, डॉ. नेहा भराडिया, डॉ.केतन राठोड, डॉ.विवेक पाऊलबुधे, डॉ.नलिनी गिते, डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ.निरंजन पेहरे, डॉ.पूनम लंकेश्वर आदी नेत्रतज्ज्ञ रूग्ण तपासणी करतील.

सोमवार दि. ३० मार्च रोजी दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया शिबीर होईल. लॅप्रोस्कोपी पोटावरील जागेचे, बेंबीवरील जागेचे, हर्निया शस्त्रक्रिया १० हजार रुपये, पित्ताशय काढणे १५ हजार रुपये, स्त्रीयांची गर्भ पिशवी काढणे हिस्ट्रोक्टॉमी १० हजार रुपये, स्टॅपलर/ लेझर पाईल्स शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, ॲपेंडिक्स शस्त्रक्रिया ४ हजार रुपये, स्त्रियांचे बिजांडकोशावरील गाठी शस्त्रक्रिया ५ हजार रुपये, गर्भ नलिकेची ट्युबल पेटेन्सी २ हजार रुपये, लॅप्रोस्कोपी स्त्रियांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया ३ हजार रुपयात करण्यात येईल. औषध व आयसीयु खर्च वेगळा असेल. लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. भास्कर जाधव, डॉ.. महेश घुगे, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ. सोनल बोरूडे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आयोजित या महाआरोग्य शिबिरांचा रूग्णांनी जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/७४/७५/७६. मो. ९४०४३९९९११

# सीसीटीव्ही बंद : झालेत की केलेत?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा फाटा –** लाखो रुपये खर्च करून नेवासकर जनतेसह जगभरातून धार्मिक पर्यटनाच्या निमित्ताने भेट देणाऱ्या माऊली भक्तांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक ठिकाणान्सह विविध शासकीय कार्यालयान्त उभारण्यात आलेली सिसिटीव्ही यंत्रणा बहुतांश मोक्याच्या ठिकाणी प्रत्यक्षात गुढरित्या बंद असल्याचे अत्यंत धक्कादायक तसेच संतापजनक वास्तव समोर आले आहे.

गुन्हेगारांसह समाजविघातक प्रवृत्तींना जरब बसविण्याच्या उदात्त हेतूने नेवासा शहराच्या विविध सार्वजनिक भागान्सह पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, पंचायत समिती आदी नेहमीच गजबजलेल्या शासकीय कार्यालयान्त शासकीय निधीतून तसेच लोकवर्गणीतून लाखो रुपये खर्चून अत्याधुनिक सिसिटीव्ही यंत्रणा उभारण्यात आली आहे. या सिसिटीव्हीच्या धास्तीने चुकीचे वर्तन करणाऱ्यांना चांगलाच आळा बसल्याचे दिसून आले आहे. विविध कारणांनी जिल्ह्यात अतिसंवेदनशील अशी ओळख असलेल्या नेवासा शहराच्या विविध भागात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याची गरज व आग्रही मागणी ग्रामस्थासह व्यवसायिकांनी वेळोवेळी व्यक्त केली होती. ही मागणी प्रचंड खर्चिक असल्याने ती पूर्णपणे प्रत्यक्षात अमलात आणण्यात शासकीय यंत्रणा तोकडी पडत होती. त्यामुळे समाजातील काही दानशूर ग्रामस्थान्सह व्यवसायिकांनी भरीव आर्थिक मदत लोकवर्गणीच्या माध्यमातून जमा करून दिल्याने जवळपास सर्वच शासकीय कार्यालयान्सह सर्वच सार्वजनिक ठिकाणे सीसीटीव्ही यंत्रणेच्या कक्षेत आल्याने सर्वांनाच बऱ्याच प्रमाणात सुरक्षिततेची जाणीव झाली होती. मोठा पसारा असलेल्या शहराच्या सुरक्षिततेबाबत पोलीस यंत्रणाही काहीशी निर्धास्त झाली होती. सदरची संपूर्ण सीसीटीव्ही यंत्रणा कार्यक्षमपणे कार्यरत आहे की नाही, यासाठी पोलीस अधिकारी स्वतः जातीने लक्ष देऊन राहत असत.

मात्र गेल्या काही महिन्यांपासून ही सीसीटीव्ही यंत्रणा कोलमडून पडली असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गेल्या काही दिवसांत तालुक्याच्या विविध भागात समाजमन हादरविणाऱ्या घटना घडलेल्या असताना अतिसंवेदनशील समजल्या जाणाऱ्या नेवासा शहराच्या विविध भागात जागता पहारा देणाऱ्या सीसीटीव्ही यंत्रणा संशयास्पदरित्या बंद असल्याचे दिसून आले आहे. गेली काही महिने सीसीटीव्ही यंत्रणा बंद असली तरी त्याबाबत साधी विचारपूस करण्यासही संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना वेळ मिळाला नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### बंद मागचे गूढ

**शहराच्या मोक्याच्या ठिकाणची सीसीटीव्ही यंत्रणा बंद कशी झाली किंवा बंद ठेवण्यात आली याबाबतच्या उलट सुलट चर्चेला परिसरात उधाण आले आहे. नेवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळू चोरीला उधाण आले असून रात्रंदिवस राजरोस वाहनातून या वाळू तस्करीची वाहतूक सुरु असल्याचे बोलले जात आहे. भविष्यात याचा पुरावा नको म्हणून तर वाळू वाहतूकच्या मार्गांवरील सीसीटीव्ही यंत्रणा बंद ठेवली तर जात नसेल? अशी शंका उपस्थित केली जाऊ लागल्याने याबाबतचे गूढ वाढले आहे.**

# रेल्वे स्टेशनच्या आनंदनगरमध्ये भक्ती संध्येत भाविक तल्लीन

## हनुमान चालीसा पठणाने भक्तीमय वातावरण; भजन-कीर्तनांनी परिसर दुमदुमला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रेल्वे स्टेशन रोड येथील आनंदनगर परिसरात "राम लक्ष्मण जानकी, जय बोलो हनुमान की जय हनुमान ज्ञान गुण सागर" अशा जयघोषात आणि सामूहिक हनुमान चालीसा पठणाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला. आदिशक्ती सार्वजनिक मित्र मंडळ व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री हनुमान चालीसा पाठ भक्ती संध्येला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दत्त मंदिर परिसरात मंगल भक्त सेवा मंडळाच्या सहकार्याने हा भक्तिमय सोहळा पार पडला. कार्यक्रमास महिला, पुरुष, युवक-युवती तसेच बालगोपाळ आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी उपस्थिती होती. परिसरातील नागरिकांनी एकत्र येत सामूहिक पठणात सहभाग घेतल्याने धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात "गणपती बाप्पा मोरया" या जयघोषाने करण्यात आली. त्यानंतर "ऐसा डमरू बजाया भोलेनाथ ने" आणि "देवा हो देवा गणपती देवा" या भक्तिगीतांनी वातावरणात अधिक रंगत आणली. दत्त महाराजांचे भजन, आईचा जोगवा यांसारख्या गीतांनी संपूर्ण परिसर भक्तीभावाने न्हाऊन निघाला.

सामूहिक नामस्मरण, हनुमान चालीसा गायन आणि विविध भक्तिगीतांच्या सादरीकरणादरम्यान उपस्थित भाविक तल्लीन झाले होते. बालगोपाळांनीही उत्साहाने भजनांवर ठेका धरत कार्यक्रमात रंगत आणली. मंगल भक्त सेवा मंडळाच्या माध्यमातून श्री विश्वेश्वर स्वामी महाराज उर्फ राजाभाऊ कोठारी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या भक्ती संध्येचे सहावे पुष्प होते. धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात ऐक्य, श्रद्धा आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असा संदेश या भक्ती संध्येतून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आदिशक्ती सार्वजनिक मित्र मंडळ व महिला मंडळाने परिश्रम घेतले. शेवटी आरतीने भक्तीमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महापुरुषांच्या अवमानप्रकरणी हरजितसिंह वधवा यांची तक्रार

## मंत्रालयाकडून 'तत्काळ' दखल; मिलन बॅन्क्वेट हॉल प्रकरण प्रशासकीय पातळीवर चौकशीला सुरुवात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हरियाणा राज्यातील मिलन बॅन्क्वेट हॉल येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमांचा वापर स्वच्छतागृह दर्शक (टॉयलेट साइनबोर्ड) म्हणून करण्यात आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणी संतापाची लाट उसळली आहे. राष्ट्रातील महान व्यक्तिमत्त्वांचा अशा प्रकारे अवमान झाल्याचा आरोप करत शहरातील सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांनी संबंधित प्रकरणी औपचारिक तक्रार दाखल केली आहे.

माहितीनुसार, सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडिओमध्ये संबंधित बॅन्क्वेट हॉलमध्ये स्वच्छतागृह दर्शविण्यासाठी शिवराय आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमा लावण्यात आल्याचे दिसत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये सोशल मीडियाद्वारे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती. या प्रकरणी हरजितसिंह वधवा यांनी पुढाकार घेऊन हरियाणा पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री कार्यालय, सांस्कृतिक कार्य विभाग आणि गृह विभाग यांना ई-मेलद्वारे तक्रार नोंदविली आहे. तक्रारीत संबंधित घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

त्यानंतर मुख्यमंत्री सचिवालय, महाराष्ट्र यांनी या तक्रारीची अधिकृत दखल घेत ती संबंधित विभागाकडे कार्यवाहीसाठी पाठविल्याची माहिती देण्यात आली. तसेच महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग यांनी तक्रार प्राप्त झाल्याची नोंद करून तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिल्याचे कळविण्यात आले आहे.

पुढील टप्प्यात महाराष्ट्र शासन गृह विभाग यांनीही सदर प्रकरण 'तत्काळ' म्हणून चिन्हांकित करून संबंधित पोलिस अधिकाऱ्यांकडे आवश्यक ती कारवाई करण्यासाठी पाठविले असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत हरजितसिंह वधवा यांनी सांगितले की, प्रशासकीय पातळीवर विषय गांभीर्याने घेतला गेला असून पुढील चौकशीची प्रक्रिया सुरू आहे. जरी हरियाणा पोलिसांकडून अद्याप अधिकृत प्रतिसाद प्राप्त झालेला नसला तरी राज्यस्तरावर या विषयाची दखल घेतली गेल्यामुळे प्रकरणाला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे.

# विज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करून विकसित भारत घडवा – डॉ. शुभांगी मोहरेकर

## डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेज मधे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रत्येक भारतीयाने विज्ञानाची कास धरली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधक वृत्ती विकसित व्हावी, विज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करून विकसित भारत घडवा.असे आवाहन न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ.शुभांगी मोहरेकर यांनी केले.

वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन.जे. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी येथे दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी या राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या २०२६ च्या थीमअंतर्गत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना () विभाग व फार्म केमिस्ट्री विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या



कार्यक्रमास जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. शुभांगी मोहरेकर (.., .. जपान) संस्थेचे सचिव श्री. रामकिसन देशमुख, खजिनदार श्री.दादासाहेब भोईटे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय गीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने झाली. यानंतर विज्ञान क्षेत्रातील महान शास्त्रज्ञांना अभिवादन करण्यात आले. विज्ञान विशेष लेखाचे वाचन प्राचार्य डॉ.श्याम पंगा यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात महिलांचे विज्ञान क्षेत्रातील योगदान, संशोधनातील संधी आणि विकसित भारत घडविण्यातील त्यांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. डॉ.मोहरेकर यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शन करताना पुढे म्हटले विज्ञानामुळे मानवी जीवन कसे सुसह्य झाले त्याचे उदाहरणे देत विज्ञानामधील गुंतागुंतीच्या संकल्पना सोप्या पद्धतीने सांगितल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग, प्रात्यक्षिके सादर केले.

(पान १ वरून)

# अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या वतीने वकिलांसाठी कार्यशाळा

नमूद केले की, हजारो वर्षांपूर्वी महिलांना कोणतेही हक्क नव्हते. १९३७ साली थोडीशी सुरुवात झाली, १९५६ साली त्यात वाढ झाली, १९९४ साली अधिक सुधारणा करण्यात आल्या आणि २००५ साली महिलांना पूर्ण अंशाने हक्क देण्यात आले. २०२० साली सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार भारतातील महिलेला वडिलांच्या मालमत्तेतील हिस्सा भावाइतकाच देण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले, भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समानतेचा जो विचार मांडला, त्या समतेचा अंमल हिंदू समाजातही याच कायद्यामुळे पूर्णत्वाला गेला आहे. प्रत्येकाने आपल्या हक्कांविषयी जागरूक राहिले पाहिजे. सुधाकर आव्हाड यांनी पुढे सांगितले की, आज बहीण-भाऊ कोर्टातच भेटतात, रक्षाबंधन सुद्धा कोर्टाच्या पायरीवर साजरा होतं हे अर्धसत्य आहे.कारण बहिणीचा हक्क म्हणजे भावाची जबाबदारी. जोपर्यंत पुरुषवर्ग जबाबदारी स्वीकारत नाही, तोपर्यंत कायद्याची अंमलबजावणी पूर्णपणे होणार नाही. कायद्याने दिले असेल ते हक्काचे आहे, आणि जर देणाऱ्यांनी स्वतःहून दिले, तर खटले निर्माण होणार नाहीत. यावेळी आव्हाड यांनी वकिलांना कायद्यातील विविध दाखले देऊन त्यांचे सखोल स्पष्टीकरण केले. अहिल्यानगर देवगिरी प्रांत, अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या वतीने झालेल्या या कार्यशाळेत ज्येष्ठ विधीज्ञ सुधाकर आव्हाड, पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघ चालक नाना जाधव, श्रीहरी बोरीकर, अधिवक्ता परिषदेचे राष्ट्रीय सचिव संजीव देशपांडे, प्रांताध्यक्ष श्रीकांत अदवंत, प्रांत महामंत्री संगीता बागुल, जिल्हाध्यक्ष ॲड. युवराज पोटे, भारत सरकार स्थायी वकील ॲड अर्पिता झरकर विभाग प्रमुख ॲड सुधीर भागवत, उपाध्यक्ष सुनील सूर्यवंशी, महामंत्री विनोद गायकवाड,अमित झरकर, विकास सांगळे, विनायक सांगळे, कौस्तुभ कुलकर्णी विजय महाजन किरण जाधव, किरण भिंगारदिवे अजिंक्य आंधळे सुनील आठरे भाऊसाहेब पालवे आकाश ढाकणे आदी सह वकिलवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी नाना जाधव म्हणाले की, घटनेमध्ये गरजेप्रमाणे बदल होणे आवश्यक आहे. व्यक्ती निर्माण करायची असेल, तर त्यामध्ये परिवर्तन झाले पाहिजे, या गोष्टीचा अभ्यास व्हावा लागतो. संघाला १०० वर्षांची परंपरा लाभली असून, समाजहितासाठी संघ अखंड कार्यरत आहे.

ते पुढे म्हणाले, पूर्वी संघाला विरोध करणाऱ्यांची मुले आज संघात काम करत आहेत. आता आम्ही शंभर वर्षांचा लेखाजोखा समाजासमोर ठेवत आहोत.समाजातील व्यवस्था परिवर्तन, जातीभेद, कुटुंबातील प्रश्न आणि पर्यावरणाचा ऱ्हास यावर काम करणे गरजेचे आहे.विधीज्ञ समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे आणि अखिल भारतीय अधिवक्ता परिषद समाजासाठी चांगले कार्य करत आहे.ॲड. युवराज पोटे म्हणाले की, अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या माध्यमातून वकील बांधवांसाठी ही कार्यशाळा आयोजित केली होती.

या कार्यशाळेत १२ जिल्ह्यांतील वकिलांचा मोठ्या संख्येने सहभाग झाला.समाजाची गरज ओळखून विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना आमंत्रित करून कार्यशाळांचे आयोजन केले जाते. ते पुढे म्हणाले, कायद्यामध्ये सतत बदल होत असतात. नवीन निकालपत्रे येतात,तरुण वकिलांना त्याची माहिती आवश्यक असते. ही माहिती वाचून समजत नाही; ती ऐकून, चर्चेतून आणि अनुभवी विधीज्ञांकडूनच समजते. म्हणूनच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत अदवंत यांनी केले, सूत्रसंचालन कौस्तुभ कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. युवराज पोटे यांनी मानले.

# बनावट बालभारती पुस्तकांवर सरकारने ठोस भूमिका घ्यावी - आ. काशिनाथ दाते

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला बाधा आणणाऱ्या आणि पालकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या या प्रकारावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी सभागृहात आवाज उठवला. त्यांच्या प्रश्नामुळे शासनाने घेतलेल्या कारवाईची सविस्तर माहिती समोर आली असून बनावट पुस्तकांवर आळा बसण्यासाठी ठोस पावले उचलली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आमदार दाते यांच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.